महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे -४११०१६

फोन नं. ०२०-२६१२२११९ Web: www.dhepune.gov.in Email : director.dhepune@nic.in

क्र.उशिंस / शिष्य-२०२६- अवर्षण-परीक्षा शुल्क- २०२६-२७/ई १३२१७१६ दिनांक ३० सप्टेंबर २०२६

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग.

२. कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे.

विषय- सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करणेबाबत

संदर्भ- १. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी - १५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८.१०.१९९३

२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र.समिती २६/प्र.क्र.८२ /मदत/ २, दि.२५.०९.२०२६.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षामंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये सार्वजनिक विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे.

आता संदर्भिय शासन निर्णय क्रमांक २ नुसार, सन २०२६ च्या खरीप हंगामातील Triger-१(प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केली आहे.

त्यानुसार आपल्या अधिनस्त संबंधीत दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयांना खालील प्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

१.संदर्भ क्रमांक १ येथील १८ ऑक्टोंबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांन कडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या प्रमाणपत्रावर सांक्षाकित करुन पाठवावे.

२. सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

Scanned with OKEN Scanner

३. तसेच विद्यापीठाने आपल्याकडे प्राप्त झालेल्या सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरून प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी .

४. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी महाविद्यालयांकडून / विद्यापीठांकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रक्कमेची माहिती संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये सादर करावी. सदरची माहिती सादर केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

५. कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

प्रत,-मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२

Scanned with OKEN Scanner

विवरणपत्र – अ

सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशिलाचे विवरणपत्र.

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या	ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम	सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृश्य तालूक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहेत अशा विद्यार्थ्यांची संख्या	ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परिक्षा फी प्रतिपुर्ती साठी आवश्यक रक्कम	एकूण विद्यार्थी संख्या	एकूण प्रतिपुर्तीची रक्कम
१	२	३	४	५	६	७

स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील विद्यार्थी हे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील रहिवाशी आहेत. तसेच त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये रु. ८.०० लक्ष मर्यादेपर्यंत आहे. त्यामुळे ते परीक्षा शुल्क माफी साठी पात्र आहेत. विद्यार्थ्यांनी शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १००% परीक्षा शुल्क माफी सवलतीसाठी अर्ज भरलेला नाही, याची खात्री केलेली आहे.

तरी दुष्काळग्रस्त भागातील (----------विद्यार्थी संख्या) व (----------रक्कम) एवढी आहे.

सही/-

विभागीय सहसंचालक

Scanned with OKEN Scanner